Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक २९] गुरूवार ते बुधवार, जुलै ३१-ऑगस्ट ६, २०२५/श्रावण ९-१५, शके १९४७ [पृष्ठे १२, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार - ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५८.

प्रभारी संचालक, नगर रचना, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.

आदेश

क्रमांक डि.टि.पी.-वि.यो.अचलपूर(सु.)-कलम-१२७(२)-आदेश-टिपीव्ही-६-४२१९.—

ज्याअर्थी, अचलपूर नगर परिषदेची विकास योजना (सुधारित) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२८९९-७६३९-प्र.क्र.१२३(अ)-९९-नवि-३०, दिनांक १५ जानेवारी, २००३ (यापुढे " उक्त अधिसूचना " असे संबोधिले आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक ०१ मार्च, २००३ पासून अंमलात आलेली आहे ; (यापुढे "उक्त मंजूर सुधारित विकास योजना" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये, अन्वये मौजा खेल तपमाळी येथील स.नं. ८३/१ या जमिनीचे अंदाजे १.७७ हे. क्षेत्र आ. क्र. १०५, " सहायक प्रादेशिक परिवहन कार्यालय ", या आरक्षणाने (यापुढे " उक्त आरक्षण " असे संबोधिले आहे) बाधित होत असल्याचे उक्त मंजूर सुधारित विकास योजना अहवालावरून दिसून येते आणि उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समूचित प्राधिकरण हे प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO), अमरावती आहे (यापुढे " उक्त समूचित प्राधिकरण " असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समूचित प्राधिकरणाने उक्त मंजूर सुधारित विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौजा खेल तपमाळी येथील स.नं. ८३/१ या जमिनीचे उक्त आरक्षणाने बाधित १७७०० चौ.मी. क्षेत्राबाबत (यापुढे " उक्त जमीन " असे संबोधिले आहे) संबंधित जमीन मालक (यापुढे " उक्त जमीन मालक " असे संबोधिले आहे) यांचे वतीने ॲड. श्री. जी. के. मुंधडा यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीन्वये उक्त समूचित प्राधिकरणावर दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी सूचना (यापुढे " उक्त सूचना " असे संबोधिले आहे) बजावली असून, ती अचलपूर नगर परिषदेस दिनांक २३ ऑक्टोबर, २०२० रोजी प्राप्त झाली होती ;

आणि ज्याअर्थी, अचलपूर नगर परिषदेने उक्त सूचनेनुषंगाने प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती यांना दिनांक १३ जानेवारी, २०२१ व दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या पत्रान्वये भूसंपादनाची कार्यवाही करणेबाबत कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समूचित प्राधिकरणाने, विहीत मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (१) मधील तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन मालकांनी मा. उच्च न्यायालय-मुंबई, नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ८२५९-२०२२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २९ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या निर्णयान्वये (यापुढे "उक्त निर्णय" असे संबोधिले आहे) उक्त जमिनीचे बाधित १.७७ हे. आर क्षेत्रावरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७ मधील तरतुदीनुसार व्यपगत झाल्याचे घोषित करुन, त्यासंदर्भाने आदेश पारित करण्याचे निर्देश दिले आहेत ;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगरपरिषद, अचलपूर यांनी पत्र क्र. २२९६-२०२५, दिनांक २४ एप्रिल, २०२५ अन्वये, उक्त निर्णयानुसार उक्त आरक्षण व्यपगत होत असल्याने उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे तरतुदींतर्गतचे आदेश प्रसिध्द करणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी पत्र क्र. ४८३, दिनांक ०६ जून, २०२५ अन्वये, मा. उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयानुसार उक्त आरक्षण व्यपगततेसंदर्भाने उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतुदीन्वये आदेश निर्गमित करणे उचित होईल, असा अहवाल सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती व मा. उच्च न्यायालयाने आदेश पारित करणेकरीता विहीत केलेला कालावधी विचारात घेता, उक्त जमिनीचे क्षेत्रावरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये भागश: व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्र. टिपीएस १८१३-३२११-प्र.क्र. ५०८-नवि-१३, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगरपरिषदा/नगर पंचायती/जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत ;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण भागश: व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे–

उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे:-

परिशिष्ट

अ.क्र.	नगर परिषद, मौजा, तालुका व जिल्हा	उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त आरक्षणे व वि. यो. अहवालानुसार अंदाचे क्षेत्र (हेक्टर)	उक्त जमिनीचा तपशील	उक्त आरक्षणाचे व्यपगत झालेले अंदाजे भागशः क्षेत्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१.	अचलपूर नगर परिषद, मौजा खेलतपमाळी, ता. अचलपूर, जि. अमरावती	आ. क्र. १०५, " सहायक प्रादेशिक परिवहन कार्यालय " क्षेत्र - ४.६४ हे.	स.क्र. ८३/१	बाधित क्षेत्र

टीप :-१. सदरचा आदेश अर्जदार यांनी पुरविलेल्या दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या मोजणी नकाशाच्या छायाप्रतीच्या अधीन राहून काढण्यात येत आहे. अर्जदार यांनी त्यांचे सूचनेअंतर्गत जागेचा अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर केलेला नसल्याने सदर आदेशामध्ये नमूद क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्भवल्यास त्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहतील.

२. सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित जमिन मालकांनी सूचनेखालील त्यांचे जागेचा भूमि अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर करणे आवश्यक राहील.

३. उक्त आरक्षणांमधून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर सुधारित विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

४. उक्त आरक्षणांमधून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, अचलपूर, जि. अमरावती यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

५. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

वि. ल. वाघमोडे,
प्रभारी संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक १७ जुलै, २०२५.

———

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५९.

BY IN-CHARGE DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

ORDER

No. D.T.P-D.P. Achalpur[O(R)+A]-Sec-127*(2)*-Order-TPV-VI-4219.—

Whereas, the Development Plan of Achalpur Municipal Council has been sanctioned as per the provisions of section 31 *(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2899-7639-CR123A-99-UD-30, dated 15th January, 2003 (hereinafter referred to as "the said Notification") & has came into force with effect from Dated 01st March, 2003, (hereinafter referred to as "the said Sanctioned Development Plan");

And whereas, in the said Sanctioned Development Plan, area admeasuring approximately 17700 sq.m. of the land bearing S.No. 83/1 of Mouza Kheltapmali, is affected by the Reservation namely Site No. 105, "Assistant Regional Transport Office" (hereinafter referred to as "the said Reservation") and the Planning and Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is Municipal Council, Achalpur (hereinafter referred to as "the said Appropriate Authority);

And whereas, the land affected by the said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan has came into force;

And whereas, on behalf of the concerned land owner (hereinafter referred to as "the said Land Owner") of the Land bearing CTS.No. 83/1 admeasuring area approximately 17700 sq. m. affected by the said Reservation (hereinafter referred to as "the said Land"), Adv. Shri. G. K. Mundhada had served a notice as per the provisions of section 127*(1)* of the the said Act, (hereinafter referred to as "the said Notice") on the said Appropriate Authority on 15th October, 2020 and same has been received by the Achalpur Municipal Council on 23rd October, 2020;

And whereas , the Achalpur Municipal Council *vide* letters dated 13th January, 2021 and 03rd February, 2021 has informed the Appropriate Authority to acquire the said Land;

And whereas, the said land under the said Reservation is not acquired or no steps as required as per the provisions of section 127*(1)* of the said Act have been taken by the Appropriate Authority within the Stipulated period from the date of service of the said notice by the said land owner as per the provisions of section 127 of the said Act;

And whereas, in the Writ Petition No. 8259-2022 filed by the said Land Owners of the said Land in the Hon'ble High Court- Mumbai, Nagpur Bench, the Hon'ble High Court has by decision dated 29th September, 2023 (hereinafter referred to as "the said Decision"), the said Reservation on the said land has been declared to have lapsed as per the provisions of section 127 of the said Act and has directed to pass orders in this regard;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Achalpur *vide* letter No, 2296/2025, dated 24th April, 2025, submitted the proposal to publish the order under the provisions of section 127 of the said Act that, the said Reservation on the said Land is lapsed as per the said decision;

And whereas, the Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati *vide* letter No. 483, dated 06th June, 2025, has submitted report that, it is necessary to issue order under the provisions of section 127 of the said Act as per the said decision for lapsing of the said Reservation;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservation on the said Land in the said Sanctioned Reservation Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order under provisions of section 127*(2)* of the said Act, regarding the partial lapsing of the said Reservation on the area admeasuring approximately 1.77 Ha. of the said land;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 01st December, 2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127*(2)* of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils/Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune:

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation in respect of the said land as per the provisions of section 127*(2)* of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows—

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Development Plan, the following new entry shall be added:-

SCHEDULE

Sr. No.	Municipal Council Mouza, Taluka and District	Proposal in the said Sanctioned Development Plan & its Approxi. Area as per D. P. Report	Description of the Land	Approximate Area lapsed of the said Reservation
(1)	(2)	(3)	(4)	(5)
1.	Achalpur Municipal Council, Mouja Kheltapmali, Tal. Achalpur, Dist. Amravati.	Reservation No. 105, "Assistant Regional Transport Office" Area 4.64 Ha.	CTS. No. 83/1	Affected Area

Note :—1. The said order is being issued subject to the photocopy of demarcation map dated 30th November, 1986 submitted by the applicant. As the applicants have not submitted the updated and certified demarcation

map of their land under notice, the applicants themselves will be responsible for any future dispute or complaint regarding the area mentioned in this order.

2. Before certifying the part plan in pursuance of the said order, the concerned land owners shall be required to submit an updated and certified demarcation map from the Land Records Department of his land under the notice.

3. The said land so released from the said Reservation shall become available to the said Land Owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Sanctioned Revised Development Plan.

4. A copy of the part plan of the said Sanctioned Revised Development Plan showing the area of the said land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Achalpur, District Amravati during office hours on all working days for inspection to public upto one month.

5. This Order shall also be published on the Directorate's official website *www.dtp.maharashtra.gov.in.*

V. L. WAGHMADE,
In-Charge Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 17th July, 2025.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६०.

आयुक्त महानगरपालिका, यांजकडून

जाहिर सूचना

क्रमांक अमनपा-आयु.-ससंनर-फेरबदल-६८८-२०२५.—

अमरावती शहराच्या मंजूर विकास योजना (सुधारित) शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना टिपीएस-२८९२-११८०-सीआर-९०-९२(बी)-नवि-१३, दिनांक ०४ डिसेंबर, १९९२ अन्वये मंजूर असून पुढे ती दिनांक २५ फेब्रुवारी, १९९३ पासून अंमलात आली आहे. अमरावती महानगरपालिकेने मा. प्रशासक यांच्या ठरावामार्फत या मंजूर विकास योजना (सु) आराखड्यामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये खालील किरकोळ फेरबदल करण्याचे ठरविले आहे.—

अनुसूची

अ. क्र.	प्रस्तावित फेरबदल	प्रशासक ठराव क्रमांक / दिनांक
(१)	(२)	(३)
१	मौजे बडनेरा, सर्व्हे क्र. ९४ भाग येथील क्षेत्र ६.०० हे. आर जागा औद्योगिक वापर क्षेत्रातून वगळून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन (IIMC) च्या प्रशिक्षण संस्थेकरीता आरक्षित करणेबाबत.	२४० ——— १८ जुलै, २०२५

सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, अमरावती यांनी दिनांक घालून स्वाक्षांकित केलेला अमरावती शहराच्या विकास योजनेचा भाग नकाशा महानगरपालिका अमरावती कार्यालयात कार्यालयीन वेळेत जनतेच्या अवलोकनार्थ खुला ठेवण्यात आला आहे.

ही अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे (३० दिवस) आत उपरोक्त फेरबदलाच्या संदर्भात नागरिकांकडून ज्या सूचना/हरकती लेखी व संकेतांक **commr.amtcorp@gmail.com** वर प्राप्त होतील. त्यावर उक्त फेरबदलांचे प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव सादर करण्यापूर्वी विचार करण्यात येईल.

सौम्या शर्मा,
आयुक्त,
महानगरपालिका, अमरावती.

अमरावती :
दिनांक २५ जुलै, २०२५.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६१.

BY COMMISSIONER, MUNICIPAL CORPORATION

Modification Under Section 37 of Maharashtra Regional And Town Planning Act, 1966 To Sanctioned Development Plan Of Amravati (Revised)

NOTIFICATION

No. MCA-Commi-ADTP-Modification-688-2025.—

The Development Plan of Amravati (R) has been sanctioned by the Government in Urban Development Department by Notification No. TPS-2892-1180-CR-90-92 (B)-UD-13, Date :- 4th December, 1992 and it has come into force with effect from 25th February, 1993. Amravati Municipal Corporation through its Administrators resolution intends to make the following modification U/S 37 *(1)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 to Sanctioned Development Plan of Amravati (Revised).

SCHEDULE

Sr. No.	Proposed Modification	Administrator Resolution No./ Dt.
(1)	(2)	(3)
1	Land bearing Mouje Badnera, S. No. 94 Pt. area 6.00 H.A. as shown on Development Plan in Industrial Zone proposed to be changed and the land so released included in for the Training Institute of Indian Institute of Mass Communication (IIMC)	240 ——————— 18th July, 2025

The copies of the plan showing there on the above said modification in the Development Plan of Amravati (R) signed by Assistant Director of Town Planning, Municipal Corporation, Amravati along with the copies of the guide-lines of the Government for modification were kept in the office of Amravati Municipal Corporation for inspection by public during office hours on all working days.

The suggestion and objection from any person which may be received in writing or on lineweb site *commr.amtcorp@gmail.com* by the Municipal Corporation, Amravati within the period of one month (30 days) from the date of publication of this notice in the *Official Gazette* shall be considered by this corporation before submitting it to Government for sanction.

SAUMYA SHARMA,
Commissioner,
Municipal Corporation, Amravati.

Amravati :
Dated the 25th July, 2025.

———————

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६२.

मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५.

जाहिर सूचना

क्रमांक नपरि-आस्था-११६४-२०२५.–

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने महत्त्वाच्या सेवा व्यापक लोकहिताच्या दृष्टीने लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करण्याबाबत नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२-प्र.क्र. ३२, दिनांक ०९ जानेवारी, २०२४

या शासन निर्णयान्वये शासनाने निर्देश दिले आहेत. त्याचप्रमाणे अधिसूचित केलेल्या लोकसेवा व अन्य बाबींचा तपशील नागरिकांना उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने तसा तपशील प्रसिध्द करणेबाबत मा. उप आयुक्त, न.प. प्रशासन संचालनालय यांचेकडील परिपत्रक नपप्रस-का ०८-DUTD-RTS-२०२३-५६६२, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ वरील परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले आहे. या अनुषंगाने रिसोड नगरपरिषदेच्या अधिसूचित करण्यात आलेल्या सेवाबाबतच्या तपशील दर्शविणारे विवरणपत्र यासोबत जोडले असून सदर विवरणपत्र पुढील प्रमाणे आहे.–

विवरण पत्र-एक

अ.क्र.	अधिसूचित करण्यात आलेले सेवेचे नांव	आवश्यक कागदपत्र	फी	नियतकाल मर्यादा	पदनिर्देशक अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकारी	द्वितीय अपिलीय प्राधिकारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१	जन्म प्रमाणपत्र देणे	विहित नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३ दिवस	जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभाग प्रमुख)	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
२	मृत्यु प्रमाणपत्र देणे	विहित नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३ दिवस	जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभाग प्रमुख)	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
३	मालमत्ता कर उतारा देणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
४	थकबाकी नसल्याचा दाखला देणे	१. विहित नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
५	अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला ३. दस्तऐवजाची प्रत (खरेदी खत/बक्षिस पत्र/ वाटणीपत्र व इतर)	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
	ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला ३. वारसा हक्क प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
६	झोन दाखला देणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा ३. मोजणी नकाशा/सिटी सर्व्हे उतारा	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	७ दिवस	नगर रचनाकार	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
७	भाग नकाशा देणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा ३. मोजणी नकाशा/सिटी सर्व्हे उतारा	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३ दिवस	नगर रचनाकार	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी

विवरणपत्र-एक-चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
८	बांधकाम परवाना देणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. वास्तुविशारदाचा दाखला ३. मालकी हक्काची कागदपत्रे ४. बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती ५. मोजणी नकाशा ६. मंजूर रेखांकनाची प्रत	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	६० दिवस	नगर रचनाकार	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
९	जोते प्रमाणपत्र देणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	नगर रचनाकार	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
१०	भोगवटा प्रमाणपत्र देणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र ३. जोते प्रमाणपत्र ४. घरमालक/वास्तुविशारद यांचे पूर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३० दिवस	नगर रचनाकार	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
११	नळजोडणी देणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. जागा मालकी कागदपत्रे ३. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
१२	जलनिःसारण जोडणी देणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. जागा मालकी कागदपत्रे ३. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
१३	अग्निशमन ना-हरकत दाखला देणे (नगरपालिकेकरिता)	१. विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला ३. वास्तुशिल्पकार यांचा अर्ज ४. आग प्रतिबंधक उपाय-योजनांबाबतची रुपरेषा ५. कॅपिटेशन फी	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	७ दिवस	सहाय्यक अग्निशमक अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
१४	अग्निशमन अंतिम ना-हरकत दाखला देणे (नगरपालिकेकरिता)	१. विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला ३. वास्तुशिल्पकार यांचा अर्ज ४. अग्निशमन यंत्रणा उभारणी केल्याचे प्रमाणपत्र ५. लायसन्स एजन्सी यांचे नमुना-अ प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	७ दिवस	सहाय्यक अग्निशमक अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी

विवरणपत्र-एक-चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
		६. विकासक/सोसायटी यांचे अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याचे हमीपत्र					
१५	नव्याने कर आकारणी	१. विहीत नमुन्यातील अर्ज २. भोगवटदार प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
१६	पुनःकर आकारणी	विहीत नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
१७	कराची मागणी पत्र तयार करणे	विहीत नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
१८	करमाफी मिळणे	१. विहीत नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	७ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
१९	थकबाकी नसल्याचा दाखला देणे (सेवा अ.क्र.१ येथील शासन निर्णयात देखील समाविष्ट)	१. विहित नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
२०	मालमत्ता कर उतारा देणे (सेवा अ.क्र.१ येथील शासन निर्णयात देखील समाविष्ट)	१. विहीत नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
२१	रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सूट मिळणे	१. विहीत नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
२२	मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे (सेवा अ.क्र. १ येथील शासन निर्णयात देखील समाविष्ट)	१. विहीत नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला ३. दस्तऐवजाची प्रत (खरेदी खत/बक्षिस पत्र/ वाटणीपत्र व इतर)	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
२३	स्वयंमूल्यांकन	१. विहीत नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
२४	आक्षेप नोंदविणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी

विवरणपत्र-एक-चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
२५	उप विभागामध्ये मालमत्ता विभाजन	१. विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला ३. मालकी हक्काची कागदपत्रे (खरेदी खत, वाटणी पत्र, बक्षीस पत्र इत्यादी)	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
२६	मालमत्ता पाडणे व पुनःबांधणी कर आकारणी	१. विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	कर अधिकारी	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
२७	नविन नळजोडणी (सेवा अ.क्र. १ येथील शासन निर्णयात देखील समाविष्ट)	१. विहित नमुन्यातील अर्ज २. जागा मालकी कागदपत्रे ३. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
२८	मालकी हक्कात बदल करणे	१. विहित नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
२९	नळजोडणी आकारामध्ये बदल करणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. जागा मालकी कागदपत्रे ३. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
३०	तात्पुरते/ कायमस्वरूपी नळजोडणी खंडीत करणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. जागा मालकी कागदपत्रे ३. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
३१	पुनर्जोडणी करणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	७ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
३२	वापरामध्ये बदल करणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
३३	पाणीदेयके तयार करणे	विहित नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
३४	प्लंबर परवाना	१. विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी

विवरणपत्र-एक-चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
३५	प्लंबर परवाना नुतनीकरण करणे	१. विहित नमुन्यातील अर्ज २. शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र ३. थकबाकी नसल्याचा दाखला	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
३६	थकबाकी नसल्याचा दाखला	विहित नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
३७	नादुरुस्त मीटर तक्रार करणे	विहित नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
३८	अनधिकृत नळ जोडणी तक्रार करणे	विहित नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	७ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
३९	पाण्याची दबाव क्षमता तक्रार	विहित नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	७ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
४०	पाण्याची गुणवत्ता तक्रार	विहित नमुन्यातील अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३ दिवस	पाणी पुरवठा अभियंता	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
४१	व्यापार व्यवसाय साठा करणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणे	१. योग्य प्रकारे भरलेल्या अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३ दिवस	नगर रचनाकार	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
४२	मंडपासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे	१. विहित नमुन्यातील अर्ज अर्ज २. शासन वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	३० दिवस	मुख्याधिकारी	जिल्हा सह-आयुक्त (नगरपरिषद प्रशासन)	विभागीय सह-आयुक्त (नगर-परिषद प्रशासन)
४३	नवीन परवाना मिळणे	१. योग्य प्रकारे भरलेल्या अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	मिळकत पर्यवेक्षक	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
४४	परवान्याचे नुतनीकरण	१. योग्य प्रकारे भरलेल्या अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	मिळकत पर्यवेक्षक	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
४५	परवाना हस्तांतरण	१. योग्य प्रकारे भरलेल्या अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	मिळकत पर्यवेक्षक	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
४६	परवाना दुय्यम प्रत	१. योग्य प्रकारे भरलेल्या अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	मिळकत पर्यवेक्षक	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी

विवरणपत्र-एक-चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
४७	व्यवसायाचे नाव बदलणे	१. योग्य प्रकारे भरलेल्या अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	मिळकत पर्यवेक्षक	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
४८	व्यवसाय बदलणे	१. योग्य प्रकारे भरलेल्या अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	मिळकत पर्यवेक्षक	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
४९	परवाना/भागीदाराचे नाव बदलणे	१. योग्य प्रकारे भरलेल्या अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	मिळकत पर्यवेक्षक	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
५०	भागीदारांच्या संख्येत बदल (वाढ/कमी)	१. योग्य प्रकारे भरलेल्या अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	मिळकत पर्यवेक्षक	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
५१	परवाना रद्द करणे	१. योग्य प्रकारे भरलेल्या अर्ज	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	मिळकत पर्यवेक्षक	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
५२	कालबाह्य परवानासाठी नुतनीकरण सूचना	१. योग्य प्रकारे भरलेल्या अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	मिळकत पर्यवेक्षक	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
५३	नवीन जाहिरात/ आकाशचिन्ह परवाना, व नुतनीकरण	१. विहीत नमुन्यातील अर्ज २. संबंधित न.प./न.पं. ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	जाहिरात विभाग प्रमुख	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी
५४	नवीन सिनेमा चित्रीकरण व परवाना नुतनीकरण	१. विहीत नमुन्यातील अर्ज २. संबंधित न.प./न.पं. ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	प्रभाग क्षेत्र अधिकारी	उपायुक्त	अतिरिक्त आयुक्त
५५	व्यवसाय परवाना स्वयं-नुतनीकरण	१. विहीत नमुन्यातील अर्ज २. संबंधित न.प./न.पं. ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र	नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर	१५ दिवस	मिळकत पर्यवेक्षक	प्रशासकीय अधिकारी	मुख्याधिकारी

रिसोड :
दिनांक २३ जुलै, २०२५.

(अवाच्य),
मुख्याधिकारी ,
नगर परिषद, रिसोड.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.